

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये 'खेलो इंडिया संवाद' व राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद् घाटन कार्यक्रमात बोलताना खा. धनंजय महाडिक. व्यासपीठावर प्राचार्य अभयकुमार साळुंखे, कौस्तुभ गावडे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# युवकांनी क्रीडा क्षेत्रात देशाचे नाव उज्ज्वल करावे : खा. महाडिक

**कोल्हापूर :** युवकांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून देशाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन खासदार धनंजय महाडिक यांनी केले. विवेकानंद कॉलेज येथे 'खेलो इंडिया संवाद' व राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील तरुणांशी साधलेल्या ऑनलाईन संवादाचे थेट प्रक्षेपण यावेळी करण्यात आले. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय खो-खो खेळाडू वैष्णवी पवार व लॉन टेनिसपटू ऐश्वर्या जाधव यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेतला. डॉ. सुप्रिया पाटील, समृद्धी चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६

# 'विवेकानंद'मध्ये 'नकाशा वाचन' कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी विभागाच्या वतीने 'नकाशा वाचन' विषयावर दोन दिवसीय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. दैनंदिन जीवनासह एनसीसी प्रशिक्षणात नकाशा वाचनाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. स्वतः एनसीसी 'सी' प्रमाणपत्रधारक असल्याने त्यांनी अनुभवांच्या आधारे कॅडेट्सना प्रेरित केले. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक जेसीओ मिलिंद देसाई यांनी नकाशा वाचनाचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले. नकाशाचे प्रकार, चिन्हे, दिशा ओळखण्याच्या पद्धती, नकाशाची हाताळणी व मांडणीची माहिती दिली. राजाराम तलाव येथे कॅडेट्सना प्रत्यक्ष प्रात्यक्षिके व सरावाची संधी देण्यात आली. सूत्रसंचालन दीक्षा शिराळे यांनी केले. प्रार्थना मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. नम्रता नरेवाडीकर यांनी आभार मानले. यावेळी सुनीता भोसले व हवालदार सणगर उपस्थित होते. कमांडिंग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे व रजिस्ट्रार सचिन धनवडे यांचे प्रोत्साहन लाभले.

31.8.26

पुण्य नगरी | सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ | कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेजच्या 'एनएसएस'तर्फे सामाजिक उपक्रम

## मातोश्री वृद्धाश्रमात रक्षाबंधन उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मातोश्री वृद्धाश्रमात रक्षाबंधनाचा सामाजिक उपक्रम उत्साहात झाला. स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना राखी बांधून त्यांच्याप्रति आदर, आपुलकी आणि कृतज्ञता व्यक्त केली.

'मातोश्री'चे शरद पाटोळे यांनी, समाजात वृद्ध व्यक्तींना योग्य सन्मान आणि प्रेम मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी ज्येष्ठ नागरिकांना राखी बांधून त्यांचे आशीर्वाद घेतले. 'वृद्धांचा सन्मान करू, आई-वडिलांची काळजी घेऊ आणि वृद्धापकाळात त्यांना एकटे पडू देणार नाही,' असा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला. याचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. संदीप पाटील यांनी केले. डॉ. राजश्री पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रवीण बागडे, आर. आर. माने, कनिष्ठ विभागाचे कार्यक्रम अधिकारी हेमंत पाटील, मंगल गवळी, स्वाती ढगे आदी उपस्थित होते. प्रबंधक सचिन धनवडे, सदानंद दुर्गुळे व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

पुण्य नगरी
सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६

# 'विवेकानंद'मध्ये नकाशा वाचन कार्यशाळा

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी विभागाच्या वतीने 'नकाशा वाचन' विषयावर आयोजित दोन दिवसीय मार्गदर्शन कार्यशाळेला कॅडेटस्‌चा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राजाराम तलाव परिसरात कॅडेटस्‌ना नकाशा वाचनाचा प्रत्यक्ष सरावही देण्यात आला. कार्यशाळेचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या हस्ते झाले. प्रमुख मार्गदर्शक जेसीओ मिलिंद देसाई यांनी नकाशाचे प्रकार, नकाशातील चिन्हे, दिशा ओळखण्याच्या पद्धती, नकाशाची हाताळणी व मांडणी याबाबत प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. सूत्रसंचालन कॅडेट दीक्षा शिराळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सीपीएल प्रार्थना मोरे यांनी करून दिला. सीटीओ डॉ. नम्रता नरेवाडीकर यांनी आभार मानले. माजी एएनओ सुनीता भोसले, हवालदार सणगर उपस्थित होते. ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे व रजिस्ट्रार सचिन धनवडे यांचे कार्यशाळेस प्रोत्साहन लाभले.

२८